**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - २२/०९/२०२३

**दि.२१/०९/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९२८/२०२३ भादविक ३०८,३२३,३४१,५०४,५०६ आर्म ॲक्ट ४,२५, महा. पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ३,७. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/०९/२०२३ रोजी ००.३० वा सुमा.आझाद कॉलनी नं.०१ चे समोर हनुमान मंदीरजवळ, काळेवाडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी १८/०६ वा |
| फिर्यादी | :- | सत्यम अनिल भारंबे वय २२ वर्षे व्यवसाय-नोकरी रा.आझाद कॉलनी नं.०३, घर नं.०४, पाचपिर चौक, काळेवाडी पुणे |
| आरोपी | :- | अजय रमेश सगर वय २५ वर्षे रा.मानेशाळा, भारतमाता चौकाजवळ काळेवाडी पुणे मुळ रा.सरकोली, पंढरपुर ता.पंढरपुर जि.सोलापुर **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र शुभम कांबळे असे मोटार सायकवरुन तापकीर चौकाकडे जात असताना आझाद कॉलनी नं.०१ चे समोर हनुमान मंदीरजवळ,काळेवाडी पुणे येथे आलो असता तेथे आरोपी याने फिर्यादी यांना जुने भांडणाचा राग मनात ठेवुन त्यांची मोटार सायकल अडवुन फिर्यादी व त्यांचा मित्र शुभम कांबळे यास शिवीगाळ करुन हाताने लाथाबुक्क्यांनी डोक्यात, छातीवर मारहाण केली. तसेच त्याचे कंबरेला लावलेला लोखंडी कोयता काढुन तो फिर्यादी यांना लागला तर त्यांचा जिव जाईल हे माहीत असताना देखील फिर्यादीचे डोक्यात मारला परंतु तो वार त्यांनी चुकविला. तसेच त्याचे हातातील कोयता हवेत भिरकावुन आरडा ओरड केल्याने तेथे जमा झालेल्या लोकांच्यात दहशत निर्माण होवुन लोक घाबरुन पळुन गेले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पाटील ९०११०७९१९७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ९५८/२०२३, भा.द.वि. कलम ३०४ (अ), २७९,३३८ मो.व्हॅ.ॲक्ट कलम १८४, ११९/१७७ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०९/२०२३ रोजी २२.३० वा. सुमा प्रिमियर प्लाझा बिग बाजार समोर जुना मुंबई पुणे हायवे रोड चिंचवड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी ०६.४१ वा. |
| फिर्यादी | :- | संदिप रघुनाथ शेळके वय ३६ वर्षे पो.शि. बक्कल नं. २१३८ नेमणुक पिंपरी पो.स्टे.पिं.चिं |
| आरोपी | :- | रामेश्वर तुळशीराम जाधव वय २३ वर्षे रा. शिंदेगाव वंदन स्वीट जवळ ता. शिन्नर जि. नाशिक मुळ गाव मु.पो. कारली ता. जि. वाशीम **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी टाटा कंपनीचा अशोक लिलँड ट्रक नंबर एम.एच. १४ एल.बी. ७०२७ वरील चालक आरोपी याने आपल्या ताब्यातील ट्रक हा हायगयीने अविचाराणे वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने चालवुन ॲक्टीव्हा मो.सा. गाडी नं. एम.एच. १४ के.पी. २५५२ हीचे वरुन जाणारे इसम नामे १)छत्रराम रामजी चौधरी वय अंदाजे ४५ वर्षे रा. पवना हौ.सोसायटी भोंडवे कॉर्नर रावेत पुणे २) आछलाराम दुर्गाजी चौधरी वय अंदाजे ५० वर्षे रा. शांती बन सोसायटी पुना गाडगीळ जवळ चिंचवड पुणे यांना पाठिमागुन जोराची धडक देवुन सदर धडकेमुळे त्यांच्या डोक्यास गंभीर दुखापत होवुन त्यांच्या मृत्युस कारणीभुत ठरला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गुळींग ९५५२५७४३१६ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४२४/२०२३ भादवि ३८५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | माहे जुलै २०२३ ते दि२४/०८/२०२३ रोजी दुपारी १२:०० वा.चे दरम्यान वेळोवेळी एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशनचे बाहेर व इंद्रायणीनगर येथील शॉपवर तसेच फिर्यादी यांचे रहाते घरी |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०९/२०२३ रोजी१८/२९ वा |
| फिर्यादी | :- | हेमंत विजय उदावंत वय-५४ धंदा - व्यवसाय रा. सी-१०६, डीएसके सुंदरबन सोसायटी, माळवाडीरोड, हडपसर, पुणे |
| आरोपी | :- | सतिश राठोड रा.डुडळगाव, पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने समक्ष व फोन वरुन, फिर्यादी व त्यांचे पार्टनर संदीप कोद्रे यांचेत समजोता झाला असतांना, आरोपीचा सदर जागेशी काही एक संबंध नसतांना, जबरदस्तीने आरोपी याने संदीप कोद्रे यांचे बरोबरचा व्यवहार पुर्ण करा. नाहीतर मी जागेचा ताबा घेईल अशी फिर्यादी यांना धमकी देवुन, फिर्यादी यांचेकडे १० लाख रुपयांची खंडणी मागितली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पानसरे,७२१८१९५२६७ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ४४१/२०२३ भा. द. वि कलम ४९८(अ),३०६,३२३,५०४,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ५ फेब्रुवारी २०१२ लग्न झाल्यापासुन वेळोवेळी व दि.१५/०९/२०२३ रोजी २३/३० वा च्या सुमारास कोल्हार भगवती ता.राहता जि अहमदनगर येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी २३/३० वा. |
| फिर्यादी | :- | घनःश्याम भानुदास पवार वय-३१ वर्ष काम- नोकरी रा.बिल्डींग नं.१८ फ्लॅट नं.२०३ ए.एस.एम.हॉस्टेल जवळ जुने आरटीओ ऑफीस पाठेमागे पुर्णा नगर पिंपरी पुणे ४११०१९ मुळ गाव- कोल्हार खुर्द ता.राहुरी जि.अहमदनगर |
| आरोपी | :- | १)अभिजीत अशोक शिंदे वय-४०वर्ष काम-डॉक्टर रा. फ्लॅट नं.७०१ ए विंग अमुल्यम सोसायटी डुडुळगाव<br>२)अशोक बाबुराव शिंदे वय- ६७ वर्ष काम-डॉक्टर रा. कोल्हार भगवतीपुर ता राहता जि. अहमदनगर<br>३) महिला आरोपी<br>४)मतिहला आरोपी<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे बहिण हिस लग्न झाले पासुन वेळोवेळी तीचे सासरी तिचे पती आरोपी क्र १ सासु आरोपी क्र ३ सासरे आरोपी क्र २ व ननंद आरोपी क्र ४ यांनी दवाखाना बांधण्या करीता तीला पैशाची मागणी करुन तिला जमिनी वरती नाक घासायला लावुन हाताने मारहाण करुन शिवीगाळ करुन शारीरीक व मानसिक आर्थिक छळ करुन त्रास देवुन धक्का बुक्की करुन घरातुन हाकलुन देवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले तसेच फिर्यादी यांना हाताने मारहाण करुन वाईट वाईट शिवीगाळ केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जोगण ९९२२८४९१०० |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | म्हाळुंगे एमआयडीसी ५७३/२०२३ भा.द.वि.क. ४२०, ४०६, ४०९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १७/०५/२०२२ रोजी सायं. १७.०० वा. ते आज पावेतो मौजे खराबवाडी गावचे हद्दीत, सारासिटी येथिल राहते घरी ता.खेड जि.पुणे येथे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी १९.१५ वा |
| फिर्यादी | :- | अमोल अशोक निखारे वय-३३ वर्षे, धंदा- नोकरी, रा. सारा सिटी, बिल्डींग नंबर-डी/४/५०२ खराबवाडी, ता. खेड, जि. पुणे. |
| आरोपी | :- | अमोल अशोक कोळी वय-२८ वर्षे, रा. धायरी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आयडीएफसी बॅंक चाकण ता खेड या बॅंकेमध्ये जमिन खरेदीकरीता १५००००/- रू लोन मंजुरीकरिता ऑनलाईन अर्ज केलेला होता यातील आरोपी हा सदर बॅंकेमध्ये फिल्ड ऑफीसर म्हणुन कामाला असुन त्याने फिर्यादीस लिंक पाठवुन ओटीपी टाकुल लोन मंजुर केले बाबत सांगीतले व नियमाप्रमाणे तीन कोरे चेक क्र ५१५०७८, ५१५०७९, ५१५०८० असे घेतले परंतु आरोपी याने फिर्यादी यांचे नावावर फिर्यादीचे संमतीशिवाय परस्पर आयडीएफसी फस्ट बॅंक बीजीएल चे एकुण ५८५१८६/७ रू व इनक्रिड फायनान्स चे ७३६६७४ रूपये असे एकुण १३२१८३३/- रू चे लोन मंजुर करून घेवुन फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर मॅसेज आलेनंतर फिर्यादी यांनी आरोपी यास सदर चे लोन मला नको आहे मला फक्त १५००००/- रू चे लोन हवे आहे बाकीची रक्कम बॅंकेत परत जमा करा असे सांगीतले त्यावेळी आरोपी याने फिर्यादीकडुन घेतलेले चेक व्दारे सदरची रक्कम परस्पर अविनाश दिलीप बगाडे याचे नावे ट्रान्सफर करून सदरची रक्कम बॅंकेत परत न भरता फिर्यादीचा विश्वासघात करून फिर्यादीची एकुण १३२१८३३/- रू ची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन गुन्हा नोंद |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जाधव ९९२२९४७६२३ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५०४/२०२३ भादवि कलम ४२०,४१९, ४०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०१९ ते २०२२ पर्यत मौजे तळेगाव दाभाडे गावचे हद्दीत सोमाटणे फाटा ता मावळ जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी १७.११ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)रहिमान सईद शेख<br>२)गौर सईद शेख ३)नफीसा रहिमान शेख तिघे रा.सर्वे नं. ५१ लक्ष्मी विलास बिल्डिंग खोली नंबर १०४ धानोरी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ याने त्याची पत्नी आरोपी क्र ३ यांचे नावे असलेला प्लॉट फिर्यादी व अली इब्रहीम सय्यद व पंकज अरूण दिक्षित यांना दाखवुन आरोपी क्र ३ हि आजारी असुन त्यांचे ऑपरेश करणे गरजेचे असल्याने त्यांना पैशाची आवश्यकता आहे. असे दाखवुण फिर्यादी यांचे कडुन १४२००००/- व नामे अली इब्रहीम सय्यद व पंकज अरूण दिक्षित यांचे कडून १५०००००/- रुपये असे एकुण २९, २०, ०००/- घेवूण एकच प्लॉट दोन ईसमाना दाखवुन दोन्ही ईसम यांचे कडून एकुण २९, २०, ०००/- रूपये घेवुन तो प्लॉट कोणालाही नावावर करून न देता दोन्ही पक्षांची फसवणुक करून घेतलेल्या रक्कमेचा अपहार करून स्वताचे फायदयाकरीता वापरून फिर्यादी व अली इब्रहीम सय्यद व पंकज अरूण दिक्षित यांची फसवणुक केलेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मुल्ला ९४०३०७१५७८ |

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ४६१ /२०२३ भादवि कलम ३२४, ३२३, ५०४, ३४,

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २१/०९/२०२३ रोजी रात्री १२/३० वा.सुमारास पत्राशेड लिंकरोड, म्हसोबा हौसिंग सोसयाटच्या पार्किंगमध्ये

गुन्हा दाखल :- दि २१/०९/२०२३ रोजी १४/३५ वा.

फिर्यादी :- करण शिशीकांत सरवदे, वय – २४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,रा – पत्राशेड लिंकरोड, म्हसोबा हौसिंग सोसयाटी चौथा मजला रुम ४०८ चिंचवड पुणे

आरोपी :- लाखन मिशराज खैरानिया वय ४० वर्षे रा म्हसोबा हौसींग सोसायटी,अे बिल्डींग,फलॅट नंबर ६१५,लिंक रोड चिंचवड पुणे
२)व त्याचा भाचा वय २० वर्ष पुर्ण नाव माहीत नाही
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे राहते सोसायटीचे पार्कीगमध्ये आरोपी याने पेट्रोल चोरीवरुन फिर्यादी यांना विनाकारण शिवीगाळ करुन आरोपी याने लाथाबुक्क्याने मारहाण केली व त्याचा भाचा याने ब्लेडसारख्या धारधार वस्तुने फिर्यादी यांच्या पाठीत वार करुन त्यांना जखमी केले

त.अधिकारी/अंमलदार :- मपोहवा खोमण,९५५२५८०१३३

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ९२९/२०२३, कलम ४०६, ४२०, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १७/०७/२०२२ रोजीपासुन ते अद्यापपर्यंत zone 10 Multi Trade, गार्डन प्लाझा, ४ था मजला, ऑफिस नं. ४०३, रहाटणी, पुणे

गुन्हा दाखल :- दि. २१/०९/२०२३ रोजी १८/०८ वा.

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- शंकर सिदाप्पा मेगाप्पागोल, रा. यादगुड, ता. हुक्केरी, जि. बेळगांव, राज्य कनार्टक. ५९१३०९, मोनं. ९६०६१५३४२४

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी zone 10 Multi Trade या कंपनीचा मालक आरोपी यांनी दररोज १ टक्का आर.ओ.आय. (रिटन ऑफ इन्व्हेस्टमेंट) २०० दिवस मिळण्याचे आमिष दाखवुन, तक्रारदार व त्यांचा मुलगा विशाल यास एकुण रक्कम रु. २२,४०,०००/- गुंतवणुक करण्यास प्रवृत्त करुन, कंपनीचे ए.यु. स्मॉल फायनान्स बँकेच्या खाते क्रमांक २२२१२४५९४०९८१६७६ यावर तक्रारदार यांचे आय.सी.आय.सी.आय. बँकेचे खाते क्रमांक ०००५०१६००४१४, आय.एफ.एस.सी. कोड आय.सी.आय.सी. ०००३३७९ यावरुन बँक अकाउंटला रक्कम ट्रान्सफर करणेस भाग पाडले. त्यापैकी तक्रारदारांना एकुण रु. ११,५३,८८०/- परत करुन उरलेली रक्कम रु. १०,८६,१२०/- तक्रारदारांचा मुलगा आजारी असुनही परत देण्यास टाळाटाळ करुन त्यांची फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि जाधव ९६५३३०६१५६

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव २८०/२०२३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(क) (फ) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी १४.३०वा.चे सुमारास शिरगाव गावचे हद्दीमध्ये पवना नदीचे कडेला अरगडे यांचे शेती जवळ |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१ /०९/२०२३ रोजी १८.४० वा |
| फिर्यादी | :- | निखील प्रफुल पाटील पोकॉ/३३४५ वय-३१ शिरगांव परंदवाडी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | प्रज्योत ईश्वर राजपुत वय १९ वर्ष रा. शिरगाव कंजारभटटवस्ती ता मावळ जि पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने हातभट्टी दारू तयार करण्यासाठी ६००० लीं. गुळ मिश्रीत रसायन जमीनीचे दोन खडयामध्ये भिजत घातलेले असा एकुन ४,८०,०००/- रु.चा प्रोव्हि माल भिजत घालताना मिळुन आली परंतु पोलीस आल्याची चाहुल लागताच पळुन गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा धायगुडे ९६५७००२६२७ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ४३९/२०२३ भादवि कलम ४२०,४०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३१/५/२०२३ रोजी ते दि ११/७/२०२३ रोजी पर्यत दिघ्ी व नलगीखोदगाव कर्नाळ हरियाना येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२३ रोजी १९.५२ वा |
| फिर्यादी | :- | शवाजी पोपट तापकीर वय ४७ वर्ष व्यावसाय शेती व दुग्ध व्यावसाय रा. ए-५,५०५ जेनेसीस, पुणे आळंदी रोड साई बाबा मंदीराचेजवळ वडमुखवाडी च-होली ता.हवेली जि.पुणे |
| आरोपी | :- | १)राकेश कुमार पुर्ण नाव माहीत नाही रा.गाव नलवी खोदगाव कुंजपुरा जवळ कर्नाळ हरियाना<br>२)रवि खोखर पुर्ण नाव माहीत नाही अरविंद डेअरी फार्मचे रा.सदर<br>३)लालाजी पुर्ण नाव पत्ता माहीत नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचा कामगार यांनी हरियाना येथे जावुन आरोपी क्र १ ते ३ यांना भेटुन फिर्यादी यांनी पसंत केलेल्या १० गाई न पाठविता खरेदी पोटी फिर्यादी यांचे कडुन १३,०००/- रु रोख , ४,५०,०००/- रु दिघी येथुन आर.टी.जीस. करुन व ४,६३,०००/- रु चोविसावाडी येथुन चेक दवारे असे एकुण रक्कम ९,२६,०००/- घेवुन व फिर्यादी यांना त्यांनी पसंत केलेल्या गाई न पाठवता दुस-याच १० गाई पाठवुन त्याही फिर्यादी यांचे पर्यत न पोहचविता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि किरवे ९९२२९५३०४८ |